ePaper
| वर्ष - 6 | अंक - 110 | UDYAM-MH-26-0158827 |

# शिवसेनेला आणखी एक धक्का, आता आदित्य ठाकरेही मोदी सरकारच्या रडारवर



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या' हक्काची!

## आतील पानांत


- 'जीएसटी'मुळे दुग्धजन्य पदार्थांची दरवाढ
- अस्सल कोल्हापुरी जेवनाचा झणझणीत स्वाद!
- मंत्रिमंडळाच्या स्थापनेनंतर यवतमाळमधील पक्षांतर करणाऱ्या इच्छुकांचा पोळा फुटणार


www.mahaenews.com | सोमवार | दिनांक 25 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



माझी मातोश्रीवर जायची इच्छा नाही. आदित्य ठाकरे यांना विनंती करतो की त्यांनी माझ्या मतदारसंघात यावं. या आधी आला नव्हतात, पण आता या, असा टोलाही सत्तार यांनी लगावला. मी राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढायला तयार आहे, फक्त एकनाथ शिंदे यांनी परवानगी द्यावी. मी किती मतांनी निवडून येतो, हेही त्यांनी पाहावं, मग कळेल कोण गद्दार आणि काय निष्ठा.

- अब्दुल सत्तार

आम्ही शिवसैनिक मुख्यमंत्री केला, असे आज सांगितले जात आहे. हेच मी अडीच वर्षांपूर्वी बोंबलून सांगत होतो. हे अडीच वर्षांपूर्वी केलं असतं तर सगळं सन्मानाने झालं असतं. पाच वर्षांमधील अडीच वर्षात भाजपाच्या एका दगडला शेंदूर (मुख्यमंत्रिपद) लागला असता. आज तुमच्या मनावर एवढा दगड पडला आहे, तर तेव्हाच हे का नाही केलं.

- उद्धव ठाकरे, शिवसेना प्रमुख



### निवडणुकीसाठी चार सदस्यीय प्रभाग?

# तीन सदस्यीय प्रभाग रचना नियमबाह्य!

## भाजपा नेते विलास मडिगेरी यांची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांबाबत दि. ४ मे २०२२ व २० जुलै २०२२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १० मार्च २०२२ रोजी व दिनांक ११ मार्च २०२२ पूर्वी अस्तित्वात असलेल्या प्रभाग रचनेनुसार निवडणूका घेण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. तरीही राज्य निवडणूक आयोग तीन सदस्यीय पध्दतीने बेकायदेशीर प्रक्रिया राबवत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तात्काळ चार सदस्यीय प्रभागरचनेची अंमलबजावणी करावी, अशी मागणी भाजप नेते तथा स्थायी समितीचे माजी सभापती विलास मडिगेरी यांनी मुख्यमंत्री,





उपमुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे. या संदर्भात विलास मडिगेरी यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे ही बाब मांडली आहे. विलास मडिगेरी यांनी पत्रात नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील १३ महानगरपालिकांकरीता राज्य निवडणूक आयोगाकडून महाविकास आघाडी सरकारने दि ३०-९-२०२१ रोजी अध्यादेश काढून कायद्यात केलेल्या बदलानुसार ३ सदस्यीय प्रभागरचना अंतिम करण्यात आलेली असुन इतर मागासवर्गीय प्रवर्ग व महिला प्रारूप आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. सदर प्रभाग रचना सदोष आहेच. परंतु सदर कारवाई सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आहे. दिनांक ४-५-२०२२ व २०-७-२०२२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश दिले आहेत. यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १०-३-२०२२ रोजी व दिनांक ११-३-२०२२ पूर्वी अस्तित्वात असलेल्या प्रभाग रचनेनुसार निवडणूका घेण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. याचा साधा अर्थ २०१७ साली केलेली अंतिम प्रभाग रचना दिनांक १०-३-२०२२ रोजी व ११-३-२०२२ पूर्वी अस्तित्त्वात होती व तीच अंतिम प्रभाग लागू होईल. तरीही महानगरपालिका कायद्यात ३०-९-२०२१ रोजी बदललेल्या सदस्य संख्येचे कारण देऊन राज्य निवडणूक आयोग बेकायदेशीररित्या व सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाविरुद्ध दिनांक १०-३-२०२२ नंतर काढलेल्या दिनांक १३-५-२०२२ रोजीच्या अंतिम प्रभाग रचनेनुसार निवडणूका घेण्याचा अट्टाहास राज्य निवडणूक आयोग करीत आहे.

### निवडणूक आयोगाकडून जनमताचा अनादर होईल...

सदरची निवडणूक जर त्रिसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार घेतली गेली तर अनेक प्रभागामध्ये विषम संख्येत आरक्षण पडण्याची शक्यता असुन समाजातील काही घटकांवर अरक्षणामध्ये अन्याय होवु शकतो. जर पूर्वीप्रमाणेच ४ सदस्यीय प्रभागरचना करण्यात आली तर समाजातील सर्व घटकांना निवडणुकीत समान संधी प्राप्त होईल. तसेच तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने त्रिसदस्यीय प्रभागरचना करतांना मोठ्या प्रमाणात राजकीय हस्तक्षेप केला असुन नियमांचे पालन न करता प्रभाग रचना केली आहे.

### हरकतींवर राजकीय दबावामुळे दुर्लक्ष...

वस्तुतः निवडणूक आयोगाने नव्याने ओ बी सी आरक्षण कार्यक्रम जाहीर करतेवेळी प्रभागरचनादेखील नव्याने जाहीर करणे आवश्यक होते. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकांसाठी तत्काळ मंत्रीमंडळाची बैठक घेवुन सर्व समाज घटकांना समान न्याय देण्याचे दृष्टीने ४ सदस्यीय प्रभागरचनेचा अध्यादेश लवकरात लवकर पारीत करावा, असे विलास मडिगेरी यांनी म्हटले आहे. या पत्रासोबत विलास मडिगेरी यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दोन्ही आदेश मार्क करून सोबत दिले आहेत.

---

# संतांच्या कृतीतून मानवतावादाची शिकवण!

## रुपाली चाकणकर यांचे मत : थेरगाव येथे भजन स्पर्धेचे पारितोषिक वितरण

। पिंपरी ।।
महाईन्यूज ।

पिंपरी: संत परंपरा आणि महाराष्ट्राचे अतुट नाते आहे. आपल्या समाजाच्या आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये संतांचा मोठा वाटा आहे. या संतांनी आपल्या कृतीतून जगाला मानवतावाद दिला, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांनी केले. राज्याचे



विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त थेरगाव येथे माजी नगरसेविका माया बारणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य भजन स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी चाकणकर बोलत होत्या. यावेळी झालेल्या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महिला अध्यक्षा कविताताई आल्हाट, सामाजिक कार्यकर्ते अभय मांढरे, माजी नगरसेवक संतोष बारणे,सतीश बारणे, संगीता कोकणे यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी हभप शेखर महाराज जांभूळकर, सुखलाल महाराज बुचडे, आबा गव्हाणे

यांच्या हस्ते भजन स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले होते. या स्पर्धेत तब्बल 90 भजनी मंडळांनी सहभाग नोंदविला. प्रस्ताविकपर बोलताना माया बारणे म्हणाल्या, शहराच्या विकासात अजितदादांचे मोठे योगदान आहे. शहराचे प्रलंबित प्रश्न सोडवितानाच त्यांनी शहराचा अतिशय वेगाने विकास केल्यामुळे पिंपरी-चिंचवड हे राष्ट्रीय पातळीवर सर्वाधिक वेगाने विकसीत होणारे शहर ठरले आहे.

विजेत्या भजनी मंडळांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसाचे वाटप करण्यात आले. या स्पर्धेमध्ये पहिल्या क्रमांक श्वास अभंग, विश्व अभंग, बुरूंजवाडी, ज्ञानदेव भजनी मंडळ, भोसरी, माऊली बाल मंडळ, चिखली यांनी पटकाविला. तर द्वितीय क्रमांक स्वरानंद भजनी मंडळ, मारुंजी, संतसंग भजनी मंडळ, रहाटणी, संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ, रोटेवाडी, मावळ यांनी पटकाविला. तिसरा क्रमांक ताजुबाई भजनी मंडळ, ताजे, मावळ, श्री. संत सावतामाळी भजनी मंडळ, वाकड, स्वरपुजा भजनी मंडळ, थेरगाव यांनी पटकाविला.

## शॉर्ट न्यूज »

### पिंपरी-चिंचवड शिवसेना नेते मधुकर बाबर यांचे निधन



। पिंपरी। महाईन्यूज ।

शिवसेना नेते, माजी नगरसेवक मधुकर बाबर (वय-७२) यांचे आज पहाटे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पत्नी, एक मुलगा, तीन मुली असा परिवार आहे. शिवसेनेचे दिवंगत खासदार गजानन बाबर आणि माजी नगरसेवक प्रकाश बाबर यांचे ते बंधू होते. शिवसेनेचे शहर प्रमुख योगेश बाबर हे त्यांचे चिरंजीव होत. सकाळी अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना निरामय रुग्णालयात दाखल केले पण तिथेच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. निगडी येथील स्मशानात त्यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# 'जीएसटी'मुळे दुग्धजन्य पदार्थांची दरवाढ!

## दही, ताकाच्या किरकोळ विक्री दरात पाच टक्क्यांनी वाढ

। पुणे। महाईन्यूज ।

दही, ताक, लस्सी या दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीवर पाच टक्के वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) आकारण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्याचा परिणाम म्हणून दही, ताक आणि लस्सीच्या विक्री दरात सरासरी पाच टक्क्यांनी वाढ झाली आहे. अमूल आणि चितळे डेअरीने दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीत वाढ केली आहे. याचा परिणाम म्हणून सामान्यांच्या खिशाला आणखी कात्री लागणार आहे. केंद्र सरकारने दही, ताक आणि लस्सी या दुग्धजन्य पदार्थाच्या वेष्टनांकित विक्रीवर पाच टक्के जीएसटी लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा परिणाम म्हणून अमूल आणि चितळेसारख्या नामांकित कंपन्यांनी आपल्या दही आणि ताकाच्या विक्री दरात पाच टक्क्यांनी वाढ केली आहे. सध्या हंगाम नसल्यामुळे लस्सीला फारशी मागणी नसल्यामुळे लस्सीच्या विक्री दरात वाढ करणे टाळले आहे. अमूलने एक किलो दह्याच्या पिशवीमागे चार रुपयांची वाढ केली आहे. ७० प्रति किलो मिळणारे दही आता ७४ रुपये प्रति किलोंवर गेले आहे. ताक ३० रुपये लिटर होते, त्यात दोन रुपयांची वाढ होऊन ते ३२ रुपयांवर गेले आहे. अशीच दही, ताकाच्या विक्रीत सरासरी पाच टक्क्यांची वाढ चितळे समूहाने केली आहे.

गोवर्धन डेअरीचे प्रीतम शहा, ऊर्जा डेअरीचे प्रकाश कुतवळ आणि कात्रज डेअरीचे प्रभारी व्यवस्थापकीय संचालक संजय कालेकर यांनी पाच टक्के जीएसटी आकारण्यामुळे दरवाढ करून ग्राहकांवर लगेच आर्थिक बोजा टाकण्याची गरज नसल्याचे मत व्यक्त केले आहे. दही, ताक, लस्सीच्या प्लास्टिक पिशवीचे वेष्टन किंवा प्लास्टिक कपाच्या वेष्टनासाठी लागणाऱ्या कच्चा मालावर १८ टक्के जीएसटी भरावा लागत होता. यापूर्वी दही, ताकाच्या विक्रीवर कर नसल्यामुळे कर परताव्याचा फायदा घेता येत नव्हता. आता उत्पादनाच्या अंतिम विक्रीवर कर असल्यामुळे वेष्टनाच्या कच्च्या मालासाठी द्यावा लागलेला जीएसटी कर परताव्याने मिळणार आहे. त्यामुळे पाच टक्के जीएसटीचा खूप मोठा फटका बसेल, असे चित्र नाही. आता पावसाळा सुरू झाला आहे. पुढील महिन्याभरात दूध संकलनात वाढ झाल्यानंतर दूध खरेदीदर कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आम्ही सध्या तरी कोणतीही वाढ करणार नाही, असे प्रीतम शहा आणि प्रकाश कुतवळ यांनी सांगितले.




### दैनंदिन संकलन 1 कोटी 40 लाख लिटर

**राज्याचे दैनंदिन दूध संकलन १ कोटी ४० लाख लिटर आहे. पावसाळ्याचा परिणाम म्हणून हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढल्यानंतर साधारण ऑगस्ट महिन्यात दूध संकलनात पाच ते सात टक्क्यांनी होऊन दूध संकलन १ कोटी ६० लाख लिटरहून अधिक होण्याची शक्यता दुग्ध व्यवसायाचे अभ्यासक प्रकाश कुतवळ यांनी व्यक्त केली. सध्या दूध पावडरचे दर प्रति किलो ७५ रुपये आणि बटरचे दर प्रति किलो ३८० रुपये असल्यामुळे शेतकऱ्यांकडून दूध खरेदी दरात कपात करण्यात आलेली नाही. ३.५ फॅटच्या गायीच्या दुधाची खरेदी ३३ ते ३५ रुपयांनी तर सहा फॅटच्या म्हशीच्या दुधाची खरेदी ४५ रुपये ३० पैसे दराने सुरू आहे.**

# आषाढ महिन्यातील शेवटच्या रविवारी लोणावळ्यात पर्यटकांची तोबा गर्दी!

## कोंडीमुळे पर्यटकांसह रहिवाशांना मनस्ताप

लोणावळा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आषाढ महिन्यातील शेवटच्या रविवारी पर्यटकांनी लोणावळा, खंडाळा परिसरात गर्दी केली होती. शहरातील सर्व रस्त्यांवर कोंडी झाल्याने वाहतूक विस्कळीत झाली. वेहेरगाव ते कार्ला फाटा, खंडाळ्यातील राजमाची गार्डन परिसरात वाहनांच्या रांगा लागल्या होता. आषाढ महिन्यातील शेवटचा रविवार असल्याने मुंबई- पुण्यासह वेगवेगळ्या भागातील पर्यटकांनी वर्षाविहारासाठी गर्दी केली होती. पर्यटक शनिवारी (२३ जुलै) सहकुटुंब मोटारीतून लोणावळा, खंडाळा परिसरात आले होते. अनेकांनी हॉटेलमधील खोल्यांचे आगाऊ आरक्षण केले होते.



लोणावळा, खंडाळा परिसरातील सर्व ठिकाणी पर्यटकांची गर्दी झाली होती. श्री एकवीरा देवीच्या दर्शनासाठी मुंबई, ठाणे परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. वेहेरगाव ते कार्ला फाटा परिसरात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. लोणावळा शहरात पुणे- मुंबईतून मोठ्या संख्येने मोटारीतून पर्यटक आले होते. खंडाळ्यात मोठ्या प्रमाणावर कोंडी झाली होती. खंडाळ्यातील शासकीय रुग्णालय परिसरात वाहनचालकांना कोंडीत अडकावे लागल्याने मनस्तापाला सामोरे जावे लागले. लोणावळ्यातील रायवुड पार्क, सहारा पूल ते मावळ चौकापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

## महाराष्ट्र एस.टी.वर्कर्स काँग्रेस (इंटक) या कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. कैलास कदम यांची निवड

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्र एस.टी.वर्कर्स काँग्रेस (इंटक) या कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. कैलास कदम यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र एस.टी. वर्कर्स काँग्रेस (इंटक) या कामगार संघटनेची राज्य कार्यकारिणीची बैठक दि.२० जुलै २०२२ रोजी लोणावळा येथील श्रम साफल्य भवन येथे संपन्न झाली.

या राज्य कार्यकारिणी बैठकीच्या अध्यक्षस्थानी इंटकचे ज्येष्ठ नेते व महाराष्ट्र इंटकचे कार्याध्यक्ष श्री. एच. बी. रावराणे तसेच बंडोपंत वाडकर, सुर्याजी इंगळे, राजपूत, बबनराव वडमारे, श्रीकांत सद्दू, राजेंद्र घुगे, रमेश शिंदे, सारीका ताई शिंदे व इतर पदाधिकारी, सभासदांच्या



उपस्थितीत बैठक पार पडली.

राज्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी इंटकचे राष्ट्रीय सचिव, महाराष्ट्र इंटकचे कार्याध्यक्ष, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते व पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा.डॉ.कैलास कदम यांची महाराष्ट्र एस टी वर्कर्स काँग्रेस (इंटक) संघटनेच्या अध्यक्षपदी सर्वानुमते व एकमुखाने ठराव पास करून निवड करण्यात आली. तसेच मुकेश तिगोटे यांची सरचिटणीस पदी फेरनिवड करण्यात आली.

## आखाड पार्टीचा बेत करताय का?

# अस्सल कोल्हापुरी जेवनाचा झणझणीत स्वाद!

## चला तर मग, आकुर्डी थरमॅक्सरोडरील "हॉटेल राजवर्धन"मध्ये!

**आकुर्डी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

अस्सल मराठमोळ्या रांगड्या कोल्हापुरी मटन-भाकरीची अस्सल गावरान चव घेण्यासाठी खवय्ये कायमच आतुरलेले असतात. त्यातच सध्या चिकन मटण रान या गावरान चवीसाठी नागरिकांना ओढा वाढला आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या मध्यवर्ती आकुर्डी भागात असलेल्या "हॉटेल राजवर्धन" १०० टक्के बोकडचे मटन भाकरीबरोबरच व सी फूडचा आस्वाद देण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे.

'हॉटेल राजवर्धन' खवय्यांच्या जिभेचे लाड नेहमीच पुरवत आली आहे. त्यामुळे उद्योगनगरीबरोबरच आसपासच्या परिसरातून देखील खवय्ये याठिकाणी १०० टक्के शुध्द नॉन व्हेज खाण्यासाठी आवर्जून हजेरी लावतात. थरमॅक्स चौकातून आकुर्डी रोडवर गरवारे वॉल रोप कंपनीलगत सहजपणे दृष्टीस पडणारे हे ठिकाण. गेल्या बारा वर्षांचा अनुभव गाठीशी असलेल्या "हॉटेल राजवर्धन"मधील कोल्हापुरी तांबडा, पांढरा रस्सा जीभेवर रेंगाळतो. या ठिकाणी मांसाहारी जेवणासोबत २५ हून अधिक व्हेज डिशने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.



मांसाहारी थाळीमध्ये राजवर्धन मटण थाळी, मटण मसाला थाळी, मटण फ्राय थाळी, मटण आळणी थाळी अशा ४ प्रकारच्या थाळी उपलब्ध आहेत. तश्या चिकन व गावरान चिकन मध्येही थाळी उपलब्ध आहेत. गावरान बोकडाच्या मटणाची चव तुम्ही न चाखल्यास याठिकाणची भेट अर्धवट राहिल, अशी खवय्यांची भावना आहे. अस्सल कोल्हापुरी जेवणाचा आस्वाद घेण्यासाठी अनेक खवय्ये सह कुटुंबासोबत येतात. याठिकाणी कोणतेही मद्यपान करण्याची बंदी असल्याने सहकुटुंब जेवण करण्यासाठी प्रथम प्राधान्य देतात.

व्हेज डिशमध्ये राजवर्धन स्पेशल व्हेज, पनीर टिक्का मसाला, अक्का मसूर, काजू पनीर मसाला यासारख्या अनेक पंजाबी डिशेस व कोल्हापुरी पिठलं मटकी मसाला, मटकी फ्राय, कोल्हापुरी बैगन मसाला अशी मराठमोळ्या डिशेस उपलब्ध करून दिल्या आहेत. कोल्हापुरी मसाल्यांचा वापर ल्याने सर्व भाज्या एकदम चविस्ट बनतात. यासोबत बाजरी ज्वारी भाकरी, तंदूर रोटी, नान रोटी आदी सुविधा देण्यात येत आहेत.

क्वालिटी आणि क्वॉनटीटी मध्ये तडजोड नाही... चवीत कोणतीही तडजोड न करता, खवय्यांच्या जिव्हेचे चोचले पुरविणारे 'हॉटेल राजवर्धन' अशी या कोल्हापुरी हॉटेलची ओळख आहे. 'हॉटेल राजवर्धन' मधील अस्सल कोल्हापुरी टेस्टमुळे खवय्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. मसाल्यांच्या योग्य मिश्रणामुळे प्रत्येक डिश कोल्हापूरची आठवण करून देते.

> "ग्राहक देवो भव" आणि सचोटीने केलेला व्यवसाय या दोन गोष्टींच्या बळावरच एक तपांहून आधिक काळ सातारा जिल्ह्यातील मराठी माणूस पिंपरी चिंचवड उद्योगनगरीत घट्ट पाय रोवून उद्योजक म्हणून उभा राहू शकला आहे.
>
> - **बबन पवार,** मालक, हॉटेल राजवर्धन.



## संपादकीय »

# जगणे परीक्षा नव्हे संधी !

***जगात पहिला मानव 26 लाख वर्षापूर्वी जन्मल्याचे आजचे विज्ञान सांगते.त्यानंतर लाखो वर्ष आपली रानटी अवस्था होती. माणूस पदावर यायला आपल्याला लाखो वर्षाचा काळ लागला.या दरम्यानच्या प्रचंड मोठ्या कालखंडात खरंतर कोणताच धर्म जगात नव्हता .***

आज जे काही धर्म जगभर आपल्याला दिसतात त्यांचे वय त्यामानाने फारच कमी म्हणजे अडीच तीन हजार वर्षाचे असल्याचे आजचे संशोधन सांगते.त्यातला सगळ्यात तरुण धर्म आहे इस्लाम.त्याचे वय अवघे 1450 वर्ष आहे.इस्लाम धर्मात माणसाच्या जगण्याचा सगळा डोलारा उभा आहे मरणावर ,खरे जीवन मेल्यावर सुरू होईल.सध्या जे काही सुरू आहे ती माणसाची फक्त परीक्षा सुरू आहे असे इस्लाम मानतो.

कमी अधिक प्रमाणात अश्याच कल्पना सगळ्या धर्मात दिसतात.धर्मांच्या बंधनात करकचून जो अनुयायी बांधला जातो त्याला वर्तमान काळाचे कोणतेही आकर्षण राहत नाही.आता जगायचे कशासाठी तर थेट जन्नत मध्ये जागा मिळावी म्हणून असे मुस्लिम मानतो.हिंदू धर्मात सुद्धा मोक्षाची कल्पना आली आहे.या जन्मात चांगली कामे,पुण्य कशासाठी करायचे कारण पुढचा जन्म चांगला मिळावा म्हणून,थेट स्वर्गात प्रवेश मिळावा नरकातील यातना आपल्या वाट्याला येऊ नयेत यासाठी काय करायला हवे हे सांगणारे असंख्य धार्मिक ग्रंथ हिंदू धर्मात आहेत.ख्रिश्चन धर्मातही स्वर्ग,नरक कल्पना आहेच.धार्मिक व्यक्तीची सगळी धडपड स्वर्गात आरक्षण कसे विनासायास होईल यासाठी असल्याचे दिसते. काल्पनिक मांडणीवर विश्वास ठेवून जगणाऱ्या लोकांची संख्या जगाच्या पाठीवर कमी नाही.खरे आयुष्य तर मेल्यानंतर सुरू होते असे आज कुणी म्हटले तर त्याला आपण वेड्यात काढू परंतु असे मानणारे अब्जावधी लोक जगात आहेत हे लक्षात घ्या.आजच्या घडीला जगात 52 मुस्लिम राष्ट्रे आहेत आणि त्यातील दीड दोन अब्ज लोक खरे आयुष्य तर मेल्यावर सुरू होते असे मानणारे आहेत कारण ही वचने त्यांच्या धर्मग्रंथात लिहिली आहेत.हिंदू,मुस्लिम,ख्रिश्चन, यहुदी या मोठ्या धर्माची मांडणी स्वर्ग,नरक बाबतीत सारखी असल्याचे जाणवते.त्यातील मुस्लिम मात्र वर्तमान काळाचे जगणे म्हणजे काहीतरी चालढकल मानतात. आजच्या प्रगत विज्ञानाच्या अनुषंगाने विचार केला तर व्यक्तीचा जन्म हा अपघात असून मृत्यू हे सर्वात मोठे सत्य आणि नियमित प्रक्रियेचा भाग आहे.पुनर्जन्म आणि मृत्यू नंतरचे जग ही शुद्ध फोकनाड आहे.जन्माच्या आधी तुम्ही कुठे होता आणि मेल्यानंतर कुठे जाणार असल्या फालतू गोष्टींना विज्ञानात अजिबात थारा नाही.त्यामुळे माणूस म्हणून तुम्ही जन्माला आले आहात म्हणून ती उत्तम संधी समजून जगणे आणि मानवतेच्या क्षेत्रात अनेक पिढ्या आठवण ठेवतील अशी कामगिरी करून या जगाचा निरोप घेणे हे आपल्या प्रत्येकाच्या हातात आहे.



## आनंदी सकाळ

# दिव्यत्वाची जेथ प्रचिती, तेथे कर माझे जुळती'

जे दिव्य आहे, आदर्श आहे त्याच्यासमोर आपण हात जोडायला हवेत. नतमस्तक व्हायला हवे. त्याही पलीकडे जाऊन, त्या आदर्शाप्रमाणे आचरण करण्याची शपथ घ्यायला हवी; कारण सध्या समाजात नतमस्तक व्हावे अशी माणसे कमी होत असताना, परस्पराप्रती आदरभाव वाढविण्यासाठी एकमेकांना वंदन करीत समाजातील वातावरण आनंददायी करण्याची गरज आहे. दिवसभरात आपण भेटलेल्या बहुतेकांना कळत नकळत नमस्कार करीत असतो. नमस्कार करताना शब्द वेगवेगळे वापरत असलो, तरी भाव मात्र समोरच्या व्यक्तीला आदर देण्याचा असतो. संवादाला अशा चांगल्या कृतीने सुरू केल्यास, पुढील बहुतेक काम सोपे जाते. नातेसंबंधही चांगले राहतात आणि सुधारतातही. समाजात जे चांगले आहेत, मदतीला धावून येतात, आपले हित पाहतात अशांना वंदन करायला हवे. देव देवळात असतो. त्याला वंदन करताना, देवाच्या रूपाने समाजात वावरणाऱ्यांनाही आदर द्यायलाच हवा.

# कसे ठरवणार आडनावांवरून ओबीसी?






राज्य सरकारसमोर सध्या सर्वात मोठे आव्हान कोणते असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ओबीसी आरक्षण मिळवून देणे. यासाठी न्यायालयाच्या आदेशानुसार इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे काम सुरू केले आहे. इम्पेरिकल डेटा म्हणजे जातीनिहाय जनगणना. यातून कोणकोणत्या जाती आहेत, त्यांची लोकसंख्या किती आहे, त्यांची आर्थिक स्थिती कशी आहे, शिक्षित आणि निरक्षर किती आहेत, राहणीमान कसे आहे आदी स्वरूपाची माहिती प्राप्त होते. महाराष्ट्रात ओबीसींना जे २७ टक्के राजकीय आरक्षण दिले जात होते, तेवढा हा समाज आजच्या घडीला आहे का? या समाजाला राजकीय पातळीवर २७ टक्के प्रतिनिधीत्व देण्याइतपत तो मागास राहिला आहे का, याची शाहनिशा करणे सर्वोच्च न्यायालयाला आवश्यक वाटले. म्हणून न्यायालयाने राज्य सरकारला हा डेटा सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

इम्पेरिकल डेटा गोळा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, यासाठी राज्य सरकारने मुंबईसह राज्यातील इतर महापालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, ग्रामपंचायती अधिनियमात सुधारणा विधेयक दोन्ही सभागृहात मांडून ते मंजूर करुन घेतले. त्यानंतर इम्पेरिकल डेटा संकलनाचे काम सुरू केले. पहिल्या टप्प्यात महापालिकेच्या स्थापनेपासून माहिती संकलित करण्यात आली. यात वॉर्ड किंवा प्रभागनिहाय आरक्षण सुरू झाले, तेव्हापासूनचा डेटा संकलित करण्यात आला आहे. दुसऱ्या टप्प्यात मतदारयाद्यांनुसार डेटा संकलनाचे गोपनीय आदेश राज्य शासनाने सर्वच महापालिकांना दिले आहेत. ओबीसी आरक्षण आणि इम्पेरिकल डेटा याविषयी सर्वत्र इतका गवगवा झालेला असतानाही महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना डेटा संकलन पद्धती गोपनीय ठेवण्याचे आदेश का दिले, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडल्यावाचून राहत नाही. खरे तर दुसऱ्या टप्प्यातील डेटा संकलित करण्याची कार्यपद्धती बघता कुणाच्याही मेंदूला झिणझिण्या आणणारी अशीच आहे. वास्तववादी इम्पेरिकल डेटा हा जनगणनेतूनच संकलित होणे शक्य होते. परंतु, जनगणना ही वेळखाऊ प्रक्रिया आहे. सरकारने राज्यभरातील महापालिकांना मतदार याद्यांमधील आडनावे बघून डेटा संकलनाचे आदेश दिलेत. कारण मतदार याद्यांमध्ये जातीचा उल्लेख नसतो. त्यामुळे आडनावांवर भर देण्यात आला. म्हणजे माळी, खोडे, काठे आदी आडनावांच्या व्यक्तींचा ओबीसींच्या रकान्यात समावेश करतानाच ठाकरे, महाले, जाधव असे जातीविषयी संभ्रमित करणाऱ्या आडनावांच्या मतदारांचा मात्र या डेटात समावेश न करण्याच्या सूचना करण्यात आल्यात.

# मराठी प्रतिभेचा आविष्कार

**चित्रपटांच्या संख्येत गेल्या काही वर्षांत मोठी वाढ होऊनही व्यावसायिक यश मिळवलेल्या मराठी चित्रपटांची संख्या अद्याप फार नसली तरी राष्ट्रीय पुरस्कारांच्या यादीतील मुख्य पुरस्कारांमध्ये मराठी नावे झळकण्याचे प्रमाण मात्र याही वर्षी चांगले आहे**

चित्रपटांच्या संख्येत गेल्या काही वर्षांत मोठी वाढ होऊनही व्यावसायिक यश मिळवलेल्या मराठी चित्रपटांची संख्या अद्याप फार नसली तरी राष्ट्रीय पुरस्कारांच्या यादीतील मुख्य पुरस्कारांमध्ये मराठी नावे झळकण्याचे प्रमाण मात्र याही वर्षी चांगले आहे. राष्ट्रीय पातळीवर आपल्या कला-गुणांचे श्रेष्ठत्व सिद्ध केलेल्या या सर्व मराठी कलावंताचे त्याबद्दल कौतुक आणि अभिनंदन केले पाहिजे. दृश्यमाध्यमाविषयीच्या जाणिवा व्यापक होत आहेत आणि त्यात सतत नवनवीन प्रतिभांची भर पडत आहे, असा याचा अर्थ होतो. चित्रपट उद्योगाच्या आशयात्मक वाढीच्या दृष्टीने हे सुचिन्ह आहे. या तरुण प्रतिभांची दखल, सरकारी पातळीवरसुद्धा केवळ बातम्यांपुरती घेतली जाते आणि हे चित्रपट प्रेक्षकांना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने काहीही केले जात नाही, ही परिस्थिती मात्र दुर्दैवाने गेली अनेक वर्षे कायम आहे. राष्ट्रीय अथवा राज्य पुरस्कार विजेते किंवा



'इफ्फी'मधील पॅनोरमा विभागासाठी निवड झालेले चित्रपट एके काळी 'दूरदर्शन'वर दाखवले जात आणि त्याबद्दल चांगला मोबदलाही दिला जात असे. हा सरकारी आर्थिक पाठिंबा काढून घेतला गेल्यावर आता 'व्यावसायिक यश' आणि 'नामवंत कलावंत' या दोनच कसोटींवर चित्रपट विकत घेणाऱ्या खासगी वाहिन्यांशिवाय या चित्रपटांना पर्याय उरत नाही. चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शित करणे हे अनेकांच्या आवाक्याबाहेरचे असते. प्रदर्शित केला तरी तो फार काळ चित्रपटगृहात ठेवणे शक्य होत नाही आणि जेमतेम जाहिरातींमुळे तो प्रदर्शित झाल्याचे अनेकांना कळत नाही. ६८व्या राष्ट्रीय पुरस्कारांत सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार मिळविलेल्या 'गोष्ट एका पैठणीची' या चित्रपटासह सुमी, जून, गोदाकाठ, फनरल, कुंकूमार्जन असे चित्रपट फिल्म सोसायटीमार्फत अथवा अन्य कोठल्याही मार्गाने अधिक प्रेक्षकांपर्यंत कशा पोचतील हे पाहणे फार गरजेचे आहे. गेल्या वर्षी ज्यांना पुरस्कार मिळाले त्यातले किती चित्रपट लोकांपर्यंत पोहोचले याचा आढावा घेतला तर अशा निर्णायक प्रयत्नांचे महत्व लक्षात येईल. या वर्षीच्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे मराठीच्या दृष्टीने आणखी एक वैशिष्ट्य असे, की लोकप्रिय चित्रपटाचा पुरस्कार मिळविणाऱ्या 'तान्हाजी' चित्रपटाचे दिग्दर्शन ओम राऊत या मराठी दिग्दर्शकाने केले आहे आणि याच चित्रपटासाठी नचिकेत बर्वे या आणखी एका मराठी कलावंताने सर्वोत्कृष्ट वेशभूषेचा पुरस्कार मिळविला आहे. चित्रपटाची कथाही एका मराठी योद्ध्याच्या पराक्रमावर बेतलेली आहे, हा तिहेरी योगायोग सुखद आहे.

## ।। अभंगवाणी ।।



त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा ।
कठिण हें जिवा तोंचिवरी ॥१॥
मागिलांचे दुःख लागों नेदी अंगा ।
अंतर हें संगा नेदी पुढें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### खासगी रुग्णालयातून अवघ्या एक दिवसाच्या अर्भकाचे अपहरण

।सांगली ।महाईन्यूज।

सांगलीतील तासगावमध्ये मध्यवस्तीत असणाऱ्या एका खासगी रुग्णालयातून अवघ्या एक दिवसाच्या अर्भकाचे अपहरण झाल्याची घटना आज (रविवार) सकाळी समोर आली. काही दिवसांपूर्वी रुग्णालयात परिचारिका म्हणून रुजू झालेल्या महिलेनेच हा प्रकार केला असण्याची शक्यता वर्तवली जात होती, पोलिसांकडूनही या महिलेचा शोध सुरू होता. अखेर संबंधित महिलेला अर्भकासह भवानीनगर किर्लोस्करवाडी येथून पोलिसांनी ताब्यात घेतले आणि बाळ सुरक्षित असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. तासगावमधील सिध्देश्वर चौकामध्ये डॉ.अंजली पाटील यांचे महिलांवरील उपचारासाठी रुग्णालय असून याच ठिकाणी अर्भकाच्या अपहरणाचा धक्कादायक प्रकार आज सकाळी घडला. आज सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान घडलेली घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली होती.चिंचणी येथील महिला दोन दिवसांपूर्वी बाळंतपणासाठी रुग्णालयात दाखल झाली होती.

### "किती जणांचा केमिकल लोचा..," राज ठाकरेंनी प्रस्तावावर विचार करु म्हणताच

# उद्धव ठाकरेंचा मिश्किल टोला!

## शिवसेना पक्षात उभी फूट, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, उघड दोन गट पडले

।मुंबई। महाईन्यूज।

शिवसेना पक्षात उभी फूट पडल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे असे उघड दोन गट पडले आहेत. या गटबाजीमुळे शिवसेना पक्षाला गळती लागली आहे. आमदारकी शाबूत ठेवायची असेल तर बंडखोर आमदारांच्या गटाला कोणत्यातरी पक्षात विलीन व्हावे लागेल, असा दावा केला जातोय. असे असताना शुक्रवारी (२३ जुलै) मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी शिंदे गटाकडून विलिनीकरणाचा प्रस्ताव आला तर त्यावर विचार करु, असे वक्तव्य केले होते. या वक्तव्यानंतर उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला लक्ष्य केले आहे. किती जणांचा केमिकल लोचा झाला असेल हे सांगता येत नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले आहेत. ते मुंबईत शिवसैनिकांना संबोधित करत होते. "अनेकदा शिवसेना फोडण्याचा प्रयत्न झाला. पण हा प्रयत्न शिवसेना संपवण्याचा आहे, हे लक्षात ठेवा. सगळे कायदेतज्ज्ञ सांगत आहेत की त्यांना (शिंदे गट) कोणत्यातरी पक्षात जाण्याखेरीज पर्याय नाही. काल त्यांना एका पक्षाने ऑफर दिलेली आहे. त्यामुळे किती जणांचा केमिकल लोचा झाला असेल, हे सांगता येत नाही," अशी मिश्किल टिप्पणी उद्धव ठाकरे यांनी केली.



### राज ठाकरे काय म्हणाले होते?

हे (शिवसेनेतील बंडखोर आमदार) माझे जुने सहकारी आहेत. याआधी त्यांनी माझ्यासोबत काम केलेले आहे. मला याबद्दल तांत्रिक माहिती नाही. पण उद्या त्यांच्याकडून असा प्रस्ताव आला तर मी नक्की विचार करेन," असे राज ठाकरे म्हणाले होते. तसेच माझ्यासाठी सर्वप्रथम माझा महाराष्ट्र सैनिक असेल. बाकी सगळे नंतर येतील, असे राज ठाकरे यांनी शनिवारी (२३ जुलै) स्पष्ट केले होते.

"बिकाऊ असणारे सगळे गेले आहेत. आता त्यांनी वेगवेगळ्या एजन्सीज कामाला लावल्या आहेत. त्यांच्याकडे पैसा अमाप आहे. ही लढाई पैसा विरुद्ध निष्ठा अशी आहे. ही साधी माणसं माझे वैभव आहे. तुम्ही कितीही पैसा ओतलात तरी हे वैभव त्याला पुरुन उरल्याशिवाय राहणार नाही," असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

"त्यांना शिवसेनेला संपवायचे आहे. पण ठाकरे आणि शिवसेना हे नाते घट्ट राहणार. तुमच्या कित्येक पिढ्या उतरल्या तरी त्यांना पाताळात गाडून आम्ही येऊ. त्यांना शिवसेना आणि ठाकरे हे नाते तोडायचे आहे. ही बंडखोरी नाही. ही हरामखोरी आहे. हा नमकहरामीपणा आहे. एवढीच मर्दुमकी असेल तर माझ्या वडिलांचा म्हणजेच शिवसेनाप्रमुखांचा फोटो लावू नका. हिंमत असेल तर स्वत:च्या नावाने मतं मागा," असे आव्हानही उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला दिले.

**"बिकाऊ असणारे सगळे गेले आहेत. आता त्यांनी वेगवेगळ्या एजन्सीज कामाला लावल्या आहेत. त्यांच्याकडे पैसा अमाप आहे. ही लढाई पैसा विरुद्ध निष्ठा अशी आहे. ही साधी माणसं माझे वैभव आहे. तुम्ही कितीही पैसा ओतलात तरी हे वैभव त्याला पुरुन उरल्याशिवाय राहणार नाही," असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.**

# मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री मंत्रिमंडळ विस्तारात मग्न!


## राज्यात दररोज चार शेतकऱ्यांची आत्महत्या

।सोलापूर ।महाईन्यूज।

उद्धव ठाकरेंचे महाविकास आघाडी सरकार कोसळल्यानंतर राज्यात शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर आले. सत्तेवर येताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र शेतकरी आत्महत्यामुक्त करू अशी छातीठोकपणे घोषणा करणारे शिंदे सरकार सध्या मंत्रिमंडळ विस्तारासाठी दिल्लीत मग्न आहे. पण, साडेतीन वर्षात नऊ हजारांहून अधिक तर मागील २३ दिवसांत जवळपास ८५ शेतकऱ्यांनी गळफास लावून आत्महत्या केल्याचे धक्कादायक वास्तव मदत व पुनर्वसन विभागाकडील आकडेवारीतून समोर आले आहे.



राज्यात १९ मार्च १९८६ या दिवशी पहिल्या शेतकरी आत्महत्येची नोंद झाली. मागील ३६ वर्षांत राज्यात ५० हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. निकषांच्या जाचक अटींमुळे अनेक कुटुंबांना मदत मिळाली नाही. बँका व खासगी सावकारांचा डोक्यावरील कर्जाचा बोजा, नापिकी, अतिवृष्टी, दुष्काळ, महापूर, हमीभाव नाही, अशा प्रमुख कारणांमुळे शेतकरी आत्महत्या अद्याप थांबलेल्या नाहीत. कोकण विभाग मागील अडीच वर्षांपासून शेतकरी आत्महत्यामुक्त झाला असून पश्चिम महाराष्ट्रात त्याचे प्रमाण कमी झाले आहे. मात्र, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व नाशिक विभागातील शेतकरी आत्महत्येचे प्रमाण अद्याप कमी होऊ शकलेले नाही. २०१९ पासून राज्यात दरवर्षी सरासरी अडीच हजार शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या पार्श्वभूमीवर आता महाराष्ट्राला शेतकरी आत्महत्यामुक्त करण्याचा संकल्प नवीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पदभार स्वीकारताच केला. पण, बंडखोरीने निर्माण झालेला पक्षांतर्गत वाद आणि मंत्रिमंडळ विस्ताराचा न सुटलेला तिढा, यामुळे मुख्यमंत्री सातत्याने दिल्ली दरबारी जात आहेत.



### साडेतीन वर्षातील आत्महत्या

| सन | आत्महत्या |
|---|---|
| २०१९ | २८०८ |
| २०२० | २५४७ |
| २०२१ | २७४३ |
| २०२२ | १२९१ |
| एकूण | ९,३८९ |

कृषी खाते मंत्र्याविना असल्याने आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये राबविली जाणारे बळीराजा चेतना अभियान व वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन कागदावरच आहे. मदत वाढीवर निर्णय नाहीच

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला सध्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर एक लाखांची शासकीय मदत केली जाते. पण, त्यात घरातील कर्ता गेलेल्या कुटुंबियांची वाटचाल होऊ शकत नाही. त्यामुळे त्या कुटुंबाला २ लाखांची मदत द्यावी, असा प्रस्ताव शासनाकडे यापूर्वीच पाठविण्यात आला आहे. पण, त्यावर अद्याप निर्णय झाला नसल्याची माहिती मदत व पुनर्वसन विभागातील विश्वसनिय सूत्रांनी दिली.

## शॉर्ट न्यूज »

### “आमची ताकद येणाऱ्या काळात दाखवून देऊ” चंद्रकांत हंडोरेंचा काँग्रेसला इशारा



।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

विधानपरिषदेच्या निवडणुकीत मतफुटी झाल्यामुळे काँग्रेसचे उमेदवार चंद्रकांत हंडोरे यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. या पराभवानंतर क्रॉसवोटिंग करणाऱ्या काँग्रेसच्या सात आमदारांवर कारवाई करण्याचा इशारा पक्षश्रेष्ठींनी दिला होता. मात्र या पराभवनानंतर चंद्रकांत हंडोरे चांगलेच नाराज असून त्यांनी आपली खदखद आज व्यक्त केली. महाराष्ट्रात चंद्रकांत हंडोरे व्यक्ती नाही तर एक ताकद आहे. ही ताकद आम्ही येणाऱ्या काळात दाखवून देऊ, असा इशारा हंडोरे यांनी काँग्रेसला दिला. आज मुबंईत भिम शक्तीकडून राज्यव्यापी चिंतन शिबिर ओयजित करण्यात आले होते.

# मंत्रिमंडळाच्या स्थापनेनंतर यवतमाळमधील पक्षांतर करणाऱ्या इच्छुकांचा पोळा फुटणार!

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ‘वेट अँड वॉच’

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यात सत्तांतर झाल्यानंतर येत्या काही महिन्यांत होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कोण कशा पद्धतीने लढणार, याची चर्चा जिल्ह्यात सुरू आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीसह आठ नगर परिषदांसाठी निवडणूक होणार आहे. राज्यातील महाविकास आघाडी सरकार पायउतार झाल्यानंतर शिंदे गट आणि भाजपने सत्ता स्थापन केली. या पार्श्वभूमीवर येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील समीकरणे जुळविण्याचे काम जिल्ह्यात सर्वच पक्षांकडून सुरू आहे. यवतमाळ जिल्हा परिषद व नगर परिषदांमध्ये गेली अनेक वर्षे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व होते. २०१४ नंतर मात्र या दोन्ही पक्षांना विरोधी बाकावर बसावे लागले. ६१ सदस्य संख्या असलेल्या यवतमाळ जिल्हा परिषदेत २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत शिवसेनेने सर्वाधिक २० जागा जिंकल्या. काँग्रेस व राष्ट्रवादी




काँग्रेसने प्रत्येकी ११ तर भाजपने १८ जागा जिंकल्या. एका जागेवर अपक्ष सदस्य निवडून आला. त्यावेळी शिवसेनेला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी भाजपने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व अपक्षासह युती केली. २०१९ मध्ये राज्यात मविआ सरकार स्थापन झाल्यानंतर जिल्हा परिषदेत सत्तांतर होऊन शिवसेना, राकाँ व काँग्रेस या पक्षांनी आघाडी करून सत्ता मिळविली व भाजप विरोधी बाकावर गेला.

**त्यामुळे शिंदे गटातून उमेदवारी नाकारल्यास अनेक नाराज शिवसेनेचा पर्याय निवडतील –**

मुळात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसकडे वर्षानुवर्षे या निवडणुका लढणारे चेहरे कायम आहेत. त्यांचे मतदारसंघ आणि उमेदवारी कायम असल्याने नव्याने पक्षांतर होण्याची शक्यता कमी आहे. उलट गेल्यावेळी घाटंजी तालुक्यातील शिरोली जिल्हा परिषद मतदारसंघातून भाजपकडून निवडून आलेले आशीष लोणकर हे आता पुन्हा आपल्या मूळ पक्षात काँग्रेसमध्ये परत आले आहेत. अशीच स्थिती अनेक मतदारसंघात निर्माण होऊ शकते. शिवसेनेचे सर्वाधिक जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य हे दिग्रस विधानसभा मतदारसंघात आहेत. हे सर्व लोकप्रतिनिधी सत्तांतरानंतर आ. संजय राठोड यांच्यासोबत कायम आहेत. मात्र याच मतदारसंघात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी तीव्र स्पर्धा आहे. त्यामुळे शिंदे गटातून उमेदवारी नाकारल्यास अनेक नाराज शिवसेनेचा पर्याय निवडतील, असे चित्र आहे. सध्यातरी इच्छुक उमेदवार वैयक्तिक पातळीवर तयारीत व्यस्त – स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील चित्र राज्यातील मंत्रिमंडळ अस्तित्वात आल्यानंतर स्पष्ट होईल, अशी प्रतिक्रिया शिवसेना जिल्हाप्रमुख पराग पिंगळे यांनी दिली. मात्र यावेळी उद्धव ठाकरे यांच्याच शिवसेनेला अधिक जागा मिळतील, असे ते म्हणाले. मंत्रिमंडळात जिल्ह्यातील कोणाची वर्णी लागते, यावरही स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बहुतांश समीकरणे अवलंबून आहेत.

### जिल्हा परिषद, नगर परिषदेसाठी इच्छुक अनेकांच्या अपेक्षांवर पाणी –

**फेब्रुवारी २०२२ मध्ये जिल्हा परिषदेचा कार्यकाळ संपला. या दरम्यान जिल्हा परिषदेच्या गट व गणांची पुनर्रचना होऊन जिल्हा परिषदेत आठ तर पंचायत समितींमध्ये १६ जागा वाढल्या. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कोणत्याही क्षणी घोषित होतील अशी स्थिती असताना राज्यात झालेल्या सत्तांतरामुळे जिल्हा परिषद, नगर परिषदेसाठी इच्छुक अनेकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले. मात्र हेच सत्तांतर अनेकांच्या पथ्यावर पडणार असेही चित्र आहे.**

### जळगावमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादीचे पदाधिकारी सध्या तरी भाजपपासून दूर

**जिल्ह्यातील ग्रामीण भागात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसची मक्तेदारी मोडीत काढून आता शिवसेना आणि भाजपनेही आपली स्थिती मजबूत केली आहे. सत्तांतरानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील समीकरणे कशी राहतील, याचे चित्र प्रत्यक्षात या निवडणुका घोषित झाल्यावरच स्पष्ट होणार आहे.**

# ‘हर घर तिरंगा’ उपक्रमांतर्गत केंद्र सरकारकडून ‘ध्वज’ संहितेत बदल!

## केंद्र सरकार कडून 24 तास तिरंगा फडकवण्याची परवानगी

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताचा तिरंगा म्हणजे सगळ्या भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. केंद्र सरकारकडून ध्वज संहिते मध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार आता दिवस – रात्र म्हणजे २४ तास तिरंगा फडकवण्याची परवानगी केंद्र सरकार कडून देण्यात आली आहे. त्याचबरोबर पॉलिस्टर आणि मशीनवर तयार केल्या ध्वजालाही वंदन करता येणार आहे. ‘हर घर तिरंगा’ या उपक्रमांतर्गत संहितेत बदल करण्यात आला.

सध्या देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजेच आझादी



का अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गतच ‘हर घर तिरंगा’ ही मोहीम राबविण्याची घोषणा करण्यात आली. या मोहिमेअंतर्गत १३ ते १५ ऑगस्ट या कालावधित घरोघरी तिरंगा फडकविण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केले आहे. केंद्रीय गृह सचिव अजय भल्ला यांनी या संदर्भातील एक पत्र सर्व केंद्रीय मंत्रालय आणि विभागांच्या सचिवांना दिले.

### 20 जुलै रोजी देण्यात आले आदेश

**भारतीय ध्वज संहिता २०२० मध्ये २० जुलै २०२२ च्या आदेशानुसार यात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार सार्वजनिक ठिकाणी आणि घरी नागरिकांना तिरंगा फडकवता येणार आहे.**

### दिवस–रात्र ध्वज फडकवता येणार

**राष्ट्रध्वज वंदनासंदर्भातील काही नियम सुद्धा आहेत. ध्वज संहिता – २००२ आणि राष्ट्रीय सन्मानाचा अवमान प्रतिबंधक कायदा – १९७१ अंतर्गतच राष्ट्रध्वज वंदनासंदर्भात नियम सांगण्यात आले आहेत. यापूर्वी राष्ट्रध्वज सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत फडकविण्यात येत होता. नव्या बदलानुसार राष्ट्रध्वज २४ तास फडकविण्याची परवानगी केंद्र सरकार कडून देण्यात आली आहे.**

# सबका साथ, सबका विकास एक धोका

## ओवैसींचा मोदी सरकारवर आरोप

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी मोदी सरकारवर टीका केली आहे. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास ही मोदी सरकारची घोषणा एक धोका आहे, असंही ओवैसी यांनी म्हटलं आहे. रस्त्यावरील विक्रेत्यांना सरकारकडून देण्यात येणाऱ्या कर्जात मोदी सरकार भेदभाव करत असल्याचाही आरोप ओवैसींनी केला आहे.

केंद्र सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाअंतर्गत स्वानिधी योजनेतून गरीब आणि रस्त्यावरील विक्रेत्यांना घरासाठी कर्ज पुरवलं जातं. या योजनेअंतर्गत मोदी



सरकारने आतापर्यंत ३२ लाख जणांना कर्ज पुरवठा केला आहे.

केवळ ३३१ अल्पसंख्याक नागरिकांना कर्ज दिलं आहे. मोदी सरकारची सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, ही घोषणा धोका असल्याचा आरोप देखील ओवैसी यांनी केला आहे.

# अर्जुन कपूरने विकलं मलायका अरोराच्या घराजवळचं घर

बॉलिवूड अभिनेती अर्जुन कपूर वारंवार त्याच्या पर्सनल आणि प्रोफेशनल आयुष्यामुळे चर्चेत असतो. सध्या तो त्याचा 'एक विलेन रिटर्न्स' या चित्रपटाच्या प्रोमोशनमध्ये व्यस्त असून अभिनेत्री मलायका अरोरा हिच्यासोबत आपलं नातं एन्जॉय करत आहे. यादरम्यान अर्जुनने त्याचं घर विकण्याचा निर्णय घेतलेला आहे. वांद्रे परिसरातील '81 औरेट बिल्डिंग' मधील 16 कोटींना घर विवलेलं आहे.

4,364 वर्ग फुट असलेला हा प्लॅट केसी मार्गावरील इमारतीच्या 19 व्या मजल्यावर आहे.20 कोटींचं हे घर अर्जुनने 16 कोटीला विकलं असून 4 कोटीचं त्याला नुकसान झालेलं आहे. दरम्यान, अर्जुनने अद्याप याबाबत काही खुलासा केलेला नाही. अर्जुनच्या या घरातून समुद्राचे खूप सुंदर दृश्य दिसायचे. याशिवाय याघरामध्ये



स्पा, लायब्ररी, स्विमिंग पूल यांसारख्या सुविधा होत्या. सध्या अर्जुन त्याच्या जुहू येथील घरामध्ये राहत आहे. तर त्याची प्रेमिका मलायका अरोरा वांद्र्यातील '81 औरेट बिल्डिंग' येथेच राहते. मलायका व्यतिरिक्त याचं बिल्डिंगमध्ये अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा, करण कुंद्रा आणि क्रिकेटर पृथ्वी शॉ सुद्धा राहतात.

मीडिया रिपोर्ट्सच्या मते, अर्जुन कपूरची एकूण संपत्ती जवळपास 74 कोटी इतकी आहे. एका चित्रपटामागे अर्जुन 5 ते 7 कोटी रूपये घेतो. दरम्यान, अर्जुन कपूर येत्या काळात 'एक विलेन रिटर्न्स'मध्ये दिसून येणार आहे. याशिवाय त्याच्याकडे 'कुत्ते' आणि 'द लेडी किलर' हे चित्रपट सुद्धा आहेत. याआधी अर्जुन कपूरचे बरेच चित्रपट रिलीज झाले आहेत. मात्र, ते बॉक्स ऑफिसवर खास कमाई करू शकले नाहीत.

# रणबीरची जादू ओसरली,

२२ जुलै रोजी 'शमशेरा' चित्रपट प्रदर्शित झाला. बॉक्स ऑफिस वर सुद्धा हा चित्रपट जास्तीत जास्त कमाई करेल असंही बोललं जात होतं. मात्र असं झालं नाही. प्रेक्षकांनी 'शमशेरा' ला थंडच प्रतिसाद दिला.

अभिनेता रणबीर कपूर हा सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहेत. नुकतंच रणबीर कपूरचं आलीय भट्ट सोबत लग्न झालं तर दुसरीकडे 'शमशेरा' या त्याच्या नव्या चित्रपटाबद्दल बोललं जातं होतं. बहुचर्चित 'शमशेरा' या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला. या चित्रपटात रणबीर कपूरची(RANBIR KAPOOR) धमाकेदार एंट्री आणि एकूणच चित्रपटाची भव्यता पाहूब प्रेक्षक भारावून गेले होते. प्रेक्षक सुद्धा चित्रपट प्रदर्शित होण्याची वाट पाहत होते आणि अखेर २२ जुलै रोजी 'शमशेरा' चित्रपट प्रदर्शित झाला. बॉक्स ऑफिस वर सुद्धा हा चित्रपट जास्तीत जास्त कमाई करेल असंही बोललं जात होतं. मात्र असं झालं नाही. प्रेक्षकांनी 'शमशेरा' ला थंडच प्रतिसाद दिला. प्रेक्षकांनी या चित्रपटाकडे पाठ फिरवली. बॉक्स ऑफिसवरही हा चित्रपट लक्षणीय कमाई करू शकाला नाही. शनिवारी २३ जुलै रोजी या चित्रपटाने केवळ ९ ते १० कोटींच्या घरात गल्ला जमावाला. आणि एकूण कमाई बघता 'शमशेरा'(SHAMSHERA) ने २० कोटींचीच कमाई केली. तर त्याच्या तुलनेत 'भुल भुलैय्या २'(BHUL BHULAIYYA 2) या चित्रपटाने पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफीसवर १४ कोटींची कमाई केली. रणबीर कपूर तब्बल ४ वर्षांनी रुपेरी पडद्यावर परतला आहे. या चित्रपटात रणबीर कपूर(RANBIR KAPOOR) आणि संजय दत्त(SANJAY DATT) यांच्या मध्ये बरेच एक्शन सिन सुद्धा दाखविण्यात आले आहेत. या चित्रपटासाठी रणबीर कपूरने घोडेस्वारीचं प्रशिक्षण सुद्धा घेतलं. या चित्रपटाचं दिग्दर्शन करण मल्होत्रा याने केले आहे. या चित्रपटात संजय दत्त, रणबीर कपूर यांच्या सोबत वाणी कपूर, आशुतोष राणा याच्या महत्वाच्या भूमिका आहेत. या चित्रपटाचं प्रमोशनही मोठया प्रमाणावर करण्यात आलं होतं त्याचबरोबर चित्रपट खूप भव्य दिव्य आहे. पण एवढं सगळं असतानाही चित्रपटाला प्रेक्षकांचा खूपच कमी प्रतिसाद मिळाला. रणबीर कपूरची मोठ्या पडद्यवरची जादू ओसरली का ? असाच प्रश्न उपस्थित होतो.



# एका जिद्दीची कहाणी

'एखादी गोष्ट आपण गमावली ही भावना खूप त्रासदायी असते, वेदनादायी असते. एखादी गोष्ट मी गमावली आहे म्हणण्यापेक्षा मुळात आपल्याकडे ती गोष्टच नसते, नव्हती, असं मनाला बजावून जगणं शिकायला हवं, असा विचार चित्रपटाची नायिका मांडते. हा विचार सोपा खचितच नाही, कुठल्याही दुर्घटनेनंतर एखाद्याचं जिद्दीने त्यातून पुन्हा उभं राहणं हा प्रेरणादायी संघर्ष असतोच.. पण हे घडत असताना मुळात माणूस म्हणून आपण नेमके कशाने कोसळतो? याचं भान येणं खूप महत्त्वाचं आहे. ती जाणीव प्रताप फड दिग्दर्शित 'अनन्या' हा चित्रपट करून देतो. 'अनन्या'ही कथा चित्रपटाच्या माध्यमातून लोकांसमोर आली आहे. एक स्वतंत्र चित्रपट म्हणूनच याकडे पाहायला हवं खरंतर.. पण एकांकिकेपासून चित्रपटापर्यंत आपलं नाव आणि लेखक-दिग्दर्शक कायम राखत आलेली ही कलाकृती तीन वेगळय़ा माध्यमातून एकच गोष्ट वेगवेगळय़ा पध्दतीने मांडत आली आहे. त्यामुळे या चित्रपटाबरोबर नाटक आणि एकांकिकेची चर्चा होणं, ज्यांनी दोन्ही पाहिलं आहे त्यांच्या मनात तुलना होणं हे साहजिकच आहे. पण अनन्या नामक तरुणीच्या जिद्दीची ही कथा रंगवताना चित्रपट या माध्यमाचं भान ठेवत त्याचा वेगळा भावनांक रंगवणं गरजेचं होतं. ज्याचा प्रामाणिक प्रयत्न लेखक – दिग्दर्शक प्रताप फड यांनी केला असल्याचं चित्रपट पाहताना जाणवतं. अनन्या ही खूप हुशार तरुणी. दिसायला सुंदर, कुशाग्र बुध्दिमत्ता, साधा-सरळ गोड स्वभाव. अनुरूपतेच्या यादीत जे जे काही घटक आवश्यक या यादीत



मोडतात त्यावर टिक करत जावं, अशी ही सर्वगुणसंपन्न मुलगी. तिच्या आयुष्यात घडलेला एक अपघात तिला सर्वगुणसंपन्न ते कोणाच्या तरी गळय़ातील धोंड अशा अवस्थेपर्यंत आणून सोडतो. या सगळय़ातून अनन्या कशा पध्दतीने स्वत:ला बाहेर काढते, हा संघर्ष या कथेत आहे. मात्र पडद्यावर ही संघर्षकथा रंगवताना त्यापलीकडे जाऊन दिग्दर्शक बरंच काही सांगण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करतो.

# जान्हवी कपूरला गणितामधलं काही कळेना



अभिनेत्री जान्हवी कपूरचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होताना दिसत आहे. कलाक्षेत्रामधील मंडळी चर्चेत राहण्यासाठी सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करतात. पण अभिनेता असो वा अभिनेत्री एखाद्या विषयावर आपलं मत विचारपूर्वक मांडतात. ट्रोलिंगपासून लांब राहण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. पण बऱ्याचदा ही कलाकार मंडळी आपल्या वक्तव्यांमुळे सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरतात. इतकंच नव्हे तर त्यांना ट्रोलिंगचाही बराच सामना करावा लागतो. असंच काहीसं अभिनेत्री जान्हवी कपूरच्या (JANHVI KAPOOR) बाबतीत घडलं आहे. जान्हवीचा एका मुलाखतीदरम्यानचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये जान्हवी गणिताबद्दल बोलताना दिसत आहे. त्यामुळे जान्हवी प्रचंड ट्रोल झाली आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर जान्हवीची नेटकऱ्यांनी खिल्ली उडवायला सुरुवात केली. जान्हवी म्हणते, "मी फक्त इतिहास आणि साहित्याबाबत अभ्यास केला आहे. या विषयांमध्ये मी चांगली प्रगती देखील केली. पण मला गणित हा विषय अजिबात आवडत नाही. मी आतापर्यंत बीजगणिताचा वापर केलाच नाही.

# बॉलिवूडच्या 'या' अभिनेत्री आहेत सर्वाधिक श्रीमंत

भारताच्या बाजूच्या देशातील पाकिस्तानी कलाकार सुद्धा चित्रपटसृष्टीशी जोडलेले आहेत. पाकिस्तानातील अनेक कलाकारांनी भारतात आपलं नाव कमावलेलं आहे. मात्र, यांची कमाई बॉलिवूडच्या तुलनेत खूप कमी आहे.

बॉलिवूड चित्रपटसृष्टीला देशातील सर्वात मोठ्या चित्रपटसृष्टीपैकी एक आहे. बॉलिवूडमध्ये काम करणारे कलाकार सुंदर आयुष्य जगतात. त्याची झलक आपल्याला त्यांच्या लाइफस्टाईलमधून पाहायला मिळते. भारतातील ही सर्वात मोठी चित्रपटसृष्टी अनेकांना



आपल्याकडे आकर्षित करून घेते. तर दुसरीकडेच भारताच्या बाजूच्या देशातील पाकिस्तानी कलाकार सुद्धा चित्रपटसृष्टीशी जोडलेले आहेत.

पाकिस्तानातील अनेक कलाकारांनी भारतात आपलं नाव कमावलेलं आहे. मात्र, यांची कमाई बॉलिवूडच्या तुलनेत खूप कमी आहे. बॉलिवूडनंतर हॉलिवूडमध्ये आपल्या अभिनयाची छाप उमटवणारी अभिनेत्री प्रियांका चोप्रा कमाईच्या बाबतीत बॉलिवूडमधील दुसऱ्या क्रमांकावरची अभिनेत्री आहे. प्रियांकाकडे जवळपास ७० मिलियन डॉलर म्हणजेच ५०० कोटींची संपत्ती आहे. तर पाकिस्तानी अभिनेत्री माया अली ही कमाईच्या बाबतीत पाकिस्तानी इंटस्ट्रीमधील दुसऱ्या क्रमांकावरची अभिनेत्री आहे.

## शॉर्ट न्यूज »

### ट्रिपल जंप फायनलमध्ये भारताचा पॉल नवव्या स्थानावर




ऑरेगॉन।। महाईन्यूज

जागतिक अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत ट्रिपल जंप प्रकारात भारताचा एल्डहोसे पॉल अंतिम फेरीत 9 व्या स्थानावर राहिला. त्याला फायनलच्या टॉप 8 मध्ये स्थान मिळवता आले नाही. त्याने 16.79 मीटर लांब उडी मारली. पॉल हा जागतिक अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत ट्रिपल जंप प्रकारात फायनलमध्ये पोहचणारा पहिला भारतीय खेळाडू आहे. एल्डहोसे पॉल पहिल्या दोन प्रयत्नात 16.37 मीटर उडी मारत पदकाच्या शर्यतीत सहाव्या क्रमांकावर राहिला. त्यानंतर त्याने आपल्या तिसऱ्या प्रयत्नात आपली कामगिरी सुधारत 16.79 मीटर उडी मारली. त्यानंतर चौथ्या प्रयत्नात त्याने 13.86 मीटर उडी मारली. पॉल पहिल्या तीन उडींच्या आधारे पहिल्या आठ जणांच्या यादीत येण्यापासून थोडक्यात चुकला. तो 19.79 मीटर उडीच्या आधारे यादीत नवव्या स्थानावर राहिला.

# शिखर धवन विराट विक्रमाच्या उंबरठ्यावर!

### धवनचे आतापर्यंत 153 वनडेत एकूण 798 चौकार मारले

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

टीम इंडिया सध्या वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे, जिथे मालिकेतील पहिल्या वनडेत विजयाने सुरुवात केली आहे. एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजचा 3 धावांनी पराभव केला. त्यानंतर आता दुसरी वनडे क्वींस पार्क ओवल, पोर्ट ऑफ स्पेन, त्रिनिदादमध्ये खेळवण्यात येणार आहे. आवेश खान किंवा अर्शदीप सिंग यांना दुसऱ्या वनडेत संधी मिळण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे, टीम इंडियाचा गब्बर म्हणजे शिखर धवन विराट



विक्रमाच्या उंबरठ्यावर आहे वेस्ट इंडिजविरुद्ध होणाऱ्या या सामन्यात, धवन नव्या विक्रमाच्या उंबरठ्यावर आहे. त्याने केवळ दोन चौकार ठोकले असता तर वनडेत त्याचे 800 चौकार पूर्ण होतील. धवनने आतापर्यंत 153 वनडेत एकूण 798 चौकार मारले आहेत. 800 चौकार पूर्ण केल्यानंतर भारतासाठी अशी कामगिरी करणारा धवन हा 9वा फलंदाज ठरेल. एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वाधिक चौकार मारण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. सचिनने 2016 मध्ये एकदिवसीय कारकिर्दीत चौकार मारले होते. यासह धवन त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील १०५०० धावा पूर्ण करण्यापासून केवळ ४ धावांनी मागे आहे.

तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना जिंकल्यानंतर भारतीय संघाने मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. झालेल्या पहिल्या सामन्यात कर्णधार शिखर धवनचे या सामन्यात तीन धावांनी शतक हुकले. त्याने 99 चेंडूत 97 धावांची खेळी खेळली. यादरम्यान शिखरने 10 चौकार आणि तीन षटकार मारले.

**दुसरी वनडे क्वींस पार्क ओवल, पोर्ट ऑफ स्पेन, त्रिनिदादमध्ये खेळवण्यात येणार आहे. आवेश खान किंवा अर्शदीप सिंग यांना दुसऱ्या वनडेत संधी मिळण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे, टीम इंडियाचा गब्बर म्हणजे शिखर धवन विराट विक्रमाच्या उंबरठ्यावर आहे वेस्ट इंडिजविरुद्ध होणाऱ्या या सामन्यात, धवन नव्या विक्रमाच्या उंबरठ्यावर आहे.**

# नीरज चोप्राची 'रुपेरी' कामगिरी!

### 19 वर्षांनंतर भारताला पदक




।लंडन । महाईन्यूज ।

भारताचा तारांकित भालाफेकपटू नीरज चोप्राने जागतिक अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदकाची कमाई केली आहे. नीरज चोप्राने ८८.१३ मीटर भालाफेक करत रौप्यपदक आपल्या नावावर केलं. लांब उडीपटू अंजू बॉबी जॉर्जने २००३ मध्ये जागतिक अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक जिंकल्यानंतर नीरज चोप्रा पदक जिंकणारा दुसरा भारतीय आणि पहिला पुरुष खेळाडू ठरला आहे. ग्रेनेडाच्या अँडरसनन पीटर्सने ९०.५४ मीटर अंतरावर भाला फेकत सुवर्णपदक जिंकलं. युजीनमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत नीरज चोप्राने पहिल्याच प्रयत्नात ८८.३९ मीटर अंतरावर भाला फेकत अंतिम फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं होतं. दरम्यान, रविवारी पार पडलेल्या अंतिम फेरीत चौथ्या प्रयत्नात नीरज चोप्राने ८८.१३ मीटर अंतरावर भाला फेकला आणि रौप्यपदक आपल्या नावे केलं. २४ वर्षीय नीरजने अग्रस्थान मिळवल्यास ऑलिम्पिक विजेतेपदापाठोपाठ जगज्जेतेपद पटकावणारा तो तिसरा भालाफेकपटू ठरला असता. दरम्यान ग्रेनेडाच्या अँडरसनन पीटर्सने ९०.५४ मीटर अंतरावर भालाफेक करत पहिलं स्थान मिळवलं.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही